**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत**
**जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळे करीता कंत्राटी तत्वावर पदभरती**
**वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,** सिंधुदुर्ग
**जिल्हाधिकारी प्रशासकीय इमारत दालन क्र. ३११,** सिंधुदुर्ग

**दूरध्वनी - (०२३६२) - २२८७१३ /२२८०६५** **ईमेल-** srgeologistoros@gmail.com

**जाहिरात क्रमांक ०१ /२०१७** **दिनांक- ११/०८/२०१७**

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व क्षेत्र बळकटीकरणासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांचे अधिनिस्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या जिल्हास्तरावरील - १ उपविभागीय स्तरावरील - ३ प्रयोगशाळेत आणि १ जिल्हास्तरावरील संनियंत्रण कक्षाकरीता खालील पदे कंत्राटी तत्वावर भरती करावयाची आहेत.

| अ. क्र | पदाचे नांव | भरावयाची एकूण पदे | पदांचे वर्गीकरण | मानधन | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रसायनी | | अ.जा. १<br>अ.ज.- १<br>खुला - १ | १२,०००/- | बी. एस्सी (रसायनशास्त्र), MS-CIT उत्तीर्ण प्राधान्य -एम.एस्सी (रसायनशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा /पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान १वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | अणुजैविक तज्ञ | | अ.जा.- १<br>अ.ज.- १ | १२,०००/- | बी. एस्सी (सुक्ष्मजीवशास्त्र) MS-CIT उत्तीर्ण प्राधान्य - एम. एस्सी (सुक्ष्मजीवशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा /पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान १वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक | | **अ.जा.- १**<br>**अ.ज.- १**<br>**खुला - २**<br>**(महिला-१)** | ८,०००/- | एच. एस. सी. उत्तीर्ण (विज्ञान -शाखा) पदवीधर असणा-यास प्राधान्य | प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ता विषयक काम करणा-यास प्राधान्य |
| ४ | प्रयोगशाळा मदतनीस/ मदतनीस | | अ.ज.- १<br>खुला - २<br>**(महिला-१)** | ६,०००/- | दहावी उत्तीर्ण | प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ता विषयक काम करणा-यास प्राधान्य |
| **एकुण पदे** | | **आरक्षित -**<br>**खुला -** | ७<br>५ (महिला- २) | | | |

**रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | पदाचे नांव | जिल्हा नियंत्रण कक्ष | जिल्हा प्रयोगशाळा | उपविभागीय प्रयोगशाळा सावंतवाडी | उपविभागीय प्रयोगशाळा मालवण | उपविभागीय प्रयोगशाळा कणकवली | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रसायनी | १ | ० | ० | १ | १ | ३ |
| २ | अणुजैविक तज्ञ | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक | ० | १ | १ | १ | १ | ४ |
| ४ | प्रयोगशाळा मदतनीस | ० | १ | १ | १ | ० | ३ |
| ५ | एकुण | | | | | | १२ |

## <u>सर्वसाधारण सूचना</u>

### <u>अर्ज व परिक्षा शुल्क इत्यादी</u> .

१. **अर्ज करावयाची पध्दत :** अर्जाचा नमुना सोबत देण्यात येत आहे. हा नमुना A४ पेपरवर एका बाजुला टंकलिखित करुन उमेदवाराने अर्ज पुर्ण भरावा व स्वयंसांक्षाकित केलेला अलिकडच्या काळातील रंगीत पासपोर्ट साईज फोटो दिलेला जागेवर चिकटवण्यात यावा. सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्याव्यतिरिक्त इतर नमुन्यात केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत/अपात्र ठरविण्यात येतील.

२. अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकास ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण केलेले असणे आवश्यक आहे .

३. उपरोक्त सर्व पदांसाठी वयाची अट किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ४३ वर्ष राहील. (शासनाच्या प्रचलित धोरणांनूसार).

४. उपरोक्त पदांकरिता उमेदवारांचे दि.<u>०१/०८/२०१७</u> रोजीचे वय विचारात घेण्यात येईल.

५. परिक्षा शूल्क अमागास उमेदवारांकरिता रु.२००/- व मागास उमेदवारांकरिता रु.१००/- सदर शुल्क हे डिमांड ड्राफटने वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांचे नावे काढावा. (१९ आक्टोबर २००७ च्या **शासन निर्णयान्वये).** मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या अटी व शर्तीची पुर्तता (उदा.वयोमर्यादा,परिक्षा शुल्क व अर्हता इ.) केल्यासच असे उमेदवार अराखीव पदांवर शिफारसीसाठी पात्र होतील.

### <u>अर्ज भरणे व सादर करणे बाबत आवश्यक सूचना.</u>

१. अर्ज भरण्यापुर्वी उमेदवारांनी सदरील जाहिरात सविस्तर वाचावी .

२. अर्ज भरतांना उमेदवाराने स्वत:चे नाव एकदा मराठी व एकदा इंग्रजीत भरावीत. इंग्रजीत नाव भरतांना **CAPITAL LETTER मध्येच भरावे.**

३.उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठर्थ शैक्षणिक अर्हता, वयाचा पुरावा, जातीचा दाखला जात वैधता प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र नोंदणी प्रमाणपत्र इ.शासनाने विहीत केलेल्या नमुन्यातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत <u>प्रपत्र ब</u> मधील लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र जोडावे .

४. अर्जासोबत स्वत:चा पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता लिहिलेला व रुपये ५ /- चा पोस्ट टिकिट लावलेला अतिरीक्त एक रिकामा लिफाफा (२७ सेमी x १२ सेमी) सोबत जोडण्यात यावा.

५. अर्जात हेतुपूरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवुन ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले बनावट दाखले सादर करणे, परिक्षा कक्षातील गैरवर्तन, परिक्षेच्या वेळी नक्कल करणे व दबाव आणणे यासारखे अथवा परिक्षा कक्षाचे बाहेर अथवा परिक्षा नंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परिक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना असतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तुणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

६. वय, शैक्षणिक अर्हता, जात वैधता प्रमाणपत्र यांचा अर्जामध्ये केलेल्या दावा बदलता येणार नाही. तसेच तोतयगिरी करण्याचा प्रयत्न करण्याऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येईल.

७. वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत इतर सर्व आवश्यक ती कागदपत्रे शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल व सदरील कागदपत्रे ही तपासणी सूची प्रमाणे पान नंबरसह क्रमाने लावणे आवश्यक आहे.

८. शैक्षणिक अर्हता संदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमुद करावी. त्या संबंधित परिक्षेच्या गूणपत्रकातील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल.व त्या आधारे उमेदवारांची पात्रता ठरविण्यात येईल.

९. अर्जासोबत विहीत नमुन्यातील प्रवेशपत्र (<u>Hall Ticket</u>) पूर्ण भरुन व फोटो चिकटवुन स्वसाक्षांकित करुन सादर करावे.

१०.अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक <u>३१/०८/२०१७</u> सायंकाळी ५.४५ वाजेपर्यत प्रत्यक्ष अथवा टपालाव्दारे. विलंबाने प्राप्त होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

११.अर्ज स्विकारणाऱ्याचा पत्ता :वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी प्रशासकीय इमारत, बी विंग, दालन क्र. ३११ सिंधुदुर्ग ४१६८१२.

**उमेदवाराने अर्ज वरिल पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावा. विहित दिनांकानंतर / वेळेनंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत.**

उमेदवारानी लिफाफ्यावर अर्ज केलेल्या पदाबाबत सुस्पष्टपणे ......................................पदासाठी अर्ज असे नमुद करणे आवश्यक आहे.

**निवड प्रक्रिया**

**शा.नि. क्र. डब्ल्यूक्युएम-२०१४/प्रक्र.५९/पापु- १२ दि.२३ फेब्रुवारी २०१५ नुसार कंत्राटी मन्युष्यबळ भरती व निवड**

राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत, मंजूर कंत्राटी मन्युष्यबळाची भरती करतांना शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त उमेदवारांची लेखी परीक्षा (डाटा एंन्ट्री ऑपरेटर वगळून) आणि डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांची कौशल्य चाचणी (Skill Test) घेण्यात येईल. लेखी परीक्षा /कौशल्य चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे १:१० (सर्वोच्च गुण मिळविणारे १० उमेदवार) या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रीत करण्यात येईल. मुलाखतीमधील प्राप्त गुणक्रमांनुसार उमेदवारांची निवड यादी (Selection list) व प्रतिक्षा यादी (Waiting list) करण्यात येईल. सर्व पदांकरीता १:५ या प्रमाणे प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननी नंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकूण ५० गुणांची बहूपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परीक्षा पात्र सर्व उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये एकूण ५० प्रश्नांकरीता १ तासाचा कालावधी राहील.

**लेखी परीक्षा**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान | १० |
| २ | बौध्दिक व विश्लेषणात्मक क्षमता | १० |
| ३ | गणितीय क्षमता | १० |
| ४ | विषयांचे ज्ञान | १० |
| ५ | संगणकाचे ज्ञान | ०५ |
| ६ | स्थानिक बाबींचे ज्ञान | ०५ |
| | **एकूण** | ५० |

**तोंडी परीक्षा**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | किमान शैक्षणिक अर्हता | ५ गुण (टक्केवारीनुसार) |
| २ | उच्च शैक्षणिक अर्हता | ५ गुण (टक्केवारीनुसार) |
| ३ | अनुभव | १० गुण |
| ४ | व्यक्तीमत्व | ०५ गुण |
| | **एकूण** | २५ गुण |

**नेमणूक आदेश** : विभागीय व जिल्हा संनियंत्रण कक्ष आणि जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळेसाठी निवड केलेल्या कंत्राटी उमेदवारांची नेमणूक, गरजेनुसार प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नेमणूक व पुनर्नियुक्ती, प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, हे करतील. नियुक्तीचे आदेशाच्या सात दिवसाच्या कालावधीत उमेदवाराने हजर होणे अनिवार्य आहे. सात दिवसापेक्षा जास्त कालावधी नंतर आदेश आपोआप रद्द होतील व प्रतिक्षा यादीतील गुणांकनानुसार पुढील उमेदवाराची नेमणुक करण्यात येईल.

**कंत्राटी पदांचे मानधन व करारनामा :** कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या मनूष्यबळासाठी ठोक मानधन अनुज्ञेय राहील. संबंधितासमवेत करारनामा करुन ०६ महिने व ०५ महिने या प्रमाणे दोन टप्प्यात तीन कार्यालयीन दिवसाचा खंड देवून ११ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती / मुदतवाढ देतांना विहित नमुन्यातील रु. १००/- च्या मुद्रांकपत्रावर बंधपत्र करण्यात येईल.

लेंखी परिक्षेचे ठिकाण ,दिनांक ,वेळ ,तसेच बैठक क्रमांक इत्यादींची माहिती मा.वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , सिंधुदुर्ग यांच्या नोटीस बोर्डावर तसेच परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारांच्या अर्जात नमुद पत्यावर पोष्टाने / ई-मेलने पाठविण्यात येईल .प्रवेशपत्र न मिळाल्यास संबंधित सदस्य सचिव, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सिंधुदुर्ग कार्यालयातुन विहीत मुदतीत म्हणजेच परिक्षेच्या दिनांकापुर्वी दोन दिवस आधी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घेणेची जबाबदारी उमेदवारांची राहील.

**टिप-** १. वर नमुद केलेल्या पदांची संख्या व पदे यामध्ये बदल होऊ शकतो तसेच भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे किंवा स्थगित करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

२. वरील सर्व पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत.

३. निवड केलेल्या उमेदवाराची नियुक्ती ११ महिन्याकरिता (६ महिने व ५ महिने याप्रमाणे दोन टप्प्यात तीन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन असेल त्यानतंर कार्यमुल्यमापन अहवाल समाधानकारक असल्यास तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात येईल.

४. अर्ज छाननी करुन पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेस बोलविण्यात येईल.जे,उमेदवार लेखी परिक्षेत पात्र ठरतील अशा उमेदवाराना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. त्यासाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर राहावे लागेल. तसेच एका उमेदवाराने कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करावा.

५. पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकुण ५० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा (सामान्य ज्ञान, बौध्दिक व विश्लेषणात्मक क्षमता, गणितीय क्षमता, विषयांचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्थानिक बाबींचे ज्ञान) लेखी परीक्षेमध्ये एकूण ५० प्रश्नांकरीता १ तासाचा कालावधी राहील. पात्र उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.

६. लेखी परिक्षा व मुलाखतीचे वेळापत्रक उमेदवारांना दूरध्वनी / भ्रमणध्वनी / एस. एम. एस. सेवा / ई मेलव्दारे कळविण्यात येईल.

७. वरिल सर्व पदांकरिता शासन नियमाप्रमाणे वयोमर्यादेची अट राहील.

८. सविस्तर तपशिलासाठी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (संकेतांक २०१५०२२३१११६२२२०२८) उपलब्ध असलेला पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्युक्युएम २०१४ / प्र.क्र.५९ / पा.पु.-१२ दिनांक २३/०२/२०१५ चे अवलोकन करावे. तसेच निवड प्रक्रियेसंबंधी माहीतीचा सविस्तर तपशील www.sindhudurg.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**स्वाक्षरीत-**
सदस्य सचिव निवड समिती तथा
वरिष्ठ भूवैज्ञानिक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सिंधुदुर्ग

**स्वाक्षरीत-**
अध्यक्ष निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

## कर्तव्य व जबाबदा-या

### रसायनी

१. पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची प्रतिदिन १० ते १५ नमुने रासायनिक तपासणी करणे.

२. दैनंदिन तपासणी केलेल्या रासायनिक नोंदी विहित नमुन्यात दररोज रजिस्टरमध्ये घेणे. रासायनिक यांनी त्यांना देण्यात आलेल्या नोंद वहया अद्यावत ठेवणे गरजेचे आहे. नमुना प्राप्त नोंद वही, पृथ:करण नोंद वही, निरिक्षण नोंद वही इ. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर नोंदकरून घेणे.

३. प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्तेसंबधी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अधिपत्या खाली काम करणारा (पाणी गुणवत्ता तज्ञ व जिल्हा पाणी गुणवत्ता निरिक्षक ) यांना देणे.

४. राज्य व जिल्हा स्तरावरुन वेळोवेळी देण्यात येणा-या पाणी गुणवत्ते संबधी सूचनांचे पालन करणे.

५. अनुजैविक तज्ञ यांच्या अनुपस्थीतीत रसायनी यांनी स्वत:च्या कामासोबत अनुजैविक तज्ञ यांची कामे पाहावीत.

६. रसायनी यांनी संयंत्रे व उपकरणे चालू स्थितीत राहतील यांची काळजी घ्यावी. पृथ:करणासाठी आवश्यक द्रावणे व इतर रसायने रसायनी यांनी तयार करावीत. उपकरणे , संयंत्रे व काच सामान स्वच्छ राहतील याची दक्षता घेतील.

७. रासायनिक तपासणीचा विश्लेषणात्मक अहवाल दर महिण्याच्या ५ तारखेपर्यंत राज्य व विभागीय स्तरावर पाठविण्यात यावा.

८. राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावरुन वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहाणे.

### अणुजैविक तज्ञ

१. पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची प्रतिदिन १० ते १५ नमुने अनुजैविक तपासणी करणे.

२. दैनंदिन तपासणी केलेल्या जैविक नमुन्याच्या नोंदी विहित नमुन्यात दररोज रजिस्टर मध्ये घेणे. अनुजैविक तज्ञ यांनी त्यांना देण्यात आलेल्या नोंद वहया अद्यावत ठेवणे गरजेचे आहे. नमुना प्राप्त नोंद वही, पृथ:करण नोंद वही, निरिक्षण नोंद वही इ. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर नोंदकरून घेणे.

३. प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्तेसंबधी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखाली काम करणारा (पाणी गुणवत्ता तज्ञ व जिल्हा पाणी गुणवत्ता निरिक्षक ) यांना देणे.

४. राज्य व जिल्हा स्तरावरुन वेळोवेळी देण्यात येणा-या पाणी गुणवत्ते संबधी सूचनांचे पालन करणे.

५. रसायनी यांच्या उपस्थीतीत अनुजैविक तज्ञ यांनी स्वत:च्या कामासोबत रसायनी यांची कामे पाहावीत.

६. अनुजैविक तज्ञ यांनी जैविक तपासणीची सर्व उपकरणे चालू स्थितीत राहतील यांची काळजी घ्यावी. पृथ:करणासाठी आवश्यक काच सामान व नमुना बाटल्या निर्जतुकीकरण करून ठेवावे.व पृथक्करणासाठी आवश्यक मिडीया तयार करून ठेवणे.

७. अनुजैविक तपासणीचा विश्लेषणात्मक अहवाल दर महिण्याच्या ५ तारखेपर्यंत राज्य व विभागीय स्तरावर पाठविण्यात यावा.

८. राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावरुन वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहाणे.

### प्रयोगशाळा सहाय्यक

१. प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारी सर्व द्रावणे तयार करणे.

२. रसायनी व जैविक तपासणी करत असतांना रसायनी व अनुजैविक तज्ञ यांना मदत करणे.

३. नमुने प्राप्त करून घेणे, प्राप्त नमुन्याच्या नोंदी नोंदवहीत घेणे.

४. प्रयोगशाळेतील सर्व नोंदवहया, रसायने, काचेचे साहित्य, उपकरणे अद्यावत ठेवणे.

५. राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावरुन वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहाणे.

६. प्रयोगशाळेच्या स्वच्छतेबाबत देखरेख करणे.

### प्रयोगशाळा मदतनीस/मदतनीस

१. प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी प्राप्त होणारे नमुने जमा करून घेण्यास मदत करणे.

२. रसायनी व जैविक तपासणी करत असतांना रसायनी व अनुजैविक तज्ञ यांना मदत करणे.

३. प्रयोगशाळा व उपकरणे स्वच्छ ठेवणे.

४. कार्यालयीन कामकाजात मदत करणे.

## अर्जाचा नमुना

**टिप; अर्जदाराने अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. या जाहीरातीतील विहित नमुन्यात नसलेले अर्ज, टंकलिखित नसलेले अर्ज, अपुर्ण माहिती भरलेले अर्ज, अव्यवस्थितीत असलेले अर्ज व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज अप्राप्त ठरविण्यात येतील.**

| **फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता** | |
|---|---|
| **अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक** | |

| |
|---|
| येथे पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकित करणे |

१. पदाचे नाव (ठळक अक्षरात) :-------------------------------------------------------

२. उमेदवाराचे संपूर्ण नाव आडनाव नाव वडिलांचे नाव

मराठी :-------------------------------------------------------------

इंग्रजी :--------------------------------------------------------------

३. लिंग (पुरुष/स्त्री) :----------------------------------------------------------------

४. जन्मतारीख :----------------------------------------------------------------

*****(**१.२.२०१६ रोजी**) वय ; वय .......... वर्ष..............महिने............दिवस

५. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोडसह) :--------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------

६. कायमस्वरुपी पत्ता :--------------------------------------------------------------
:--------------------------------------------------------------

७. दूरध्वनी क्र. (STD कोडसह) :-------------------------------------------------------------

८. भ्रमणध्वनी क्रमांक :----------------------------------------------------------------

९. ई मेल पत्ता :----------------------------------------------------------------

१०. जात :-----------------------जातीचा प्रवर्ग--------------------------

११. अर्जदार विवाहित /अविवाहित असल्यास अशी ✓ खुण करावी

| विवाहित | | अविवाहित | |
|---|---|---|---|
| | | | |

१२. संगणकावर (एम.एस.सी.आय.टी वा तत्सम प्रोग्राम) :-----------------------------------------------
काम करण्याचा अनुभव आहे काय?

१३. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परिक्षामंडळाचे विद्यापीठाचे नाव | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष | अर्जासोबत सत्यप्रत जोडली आहे /नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस. एस. सी. | | | | |
| २ | एच. एस. सी. | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | पदव्युत्तर पदवी | | | | |
| ५ | MS-CIT | | | | |
| ६ | टंकलेखन इंग्रजी | | | | |
| ७ | टंकलेखन मराठी | | | | |
| ८ | इतर | | | | |

१४. अनुभवाचा तपशील :

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता | पदाचे नाव व वेतनश्रेणी | कामाचा कालावधी | | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१५. इतर माहिती : ------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

१६. अर्जासोबत जोडलेली प्रमाणपत्रे -

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |

<u>प्रतिज्ञापत्र</u>

मी श्री/श्रीमती------------------------------------------------------- प्रमाणित करतो/करते कि, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. अर्जात उल्लेख केलेली सर्व प्रमाणपत्रे (दाखले) मुळ प्रतीमध्ये मुलाखतीच्या वेळेस सादर करावी लागतील याची जाणीव मला आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनूषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस पात्र राहील. **तसेच सदर पदावरील नियूक्ती ही तात्पूरत्या स्वरुपातील निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही** याची मला पूर्णपणे जाणीव असून शासन सेवेत कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

दिनांक : / /

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

(अर्जदाराचे नाव -----------------------------------------------------)

वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग.
बी ब्लॉक दूसरा मजला, दालन क्र.३११, प्रशासकिय इमारत,
सिंधुदुर्गनगरी (ओरोस) ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग.
ई-मेल srgeologistoros@gmail.com दुरध्वनी क्र.२२८७१३/२२८०६५

**प्रवेशपत्र**

| आसन क्रमांक - |
|---|

उमेदवाराचे पूर्ण नाव - ---------------------------------------------------

अर्ज केलेल्या पदाचे नाव - -----------------------------------------

पत्ता - -----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वतः साक्षांकित करणे |
|---|

**वरिष्ठ भूवैज्ञानिक तथा सदस्य सचिव**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**सिंधुदुर्ग**

**टिप - आसन क्रमांक वगळून माहिती भरावी.**

प्रपत्र ब

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना- अ

प्रतिज्ञापत्र (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------ श्री.--------------------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय वर्ष राहणार ---------------------------------------------------- याद्वारे पुढिलप्रमाणे असे जाहिर करते/करतो की,

१) मी ------------------------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ----------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमध्ये या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- अर्जदाराची सही

दिनांक:- अर्जदाराचे संपूर्ण नांव-------------------------------

**परिशिष्ट : २**

**कंत्राटी तत्वावर नियुक्ती करतांना घ्यावयाचा करारनामा नमुना**

Address of the employer
-----------------------------
-----------------------------
-----------------------------
Dated :- / /

To,

Shri / Smt. -------------------------------------------------------
-------------------------------------------------------

**Sub.**:- Contractual assignment as ------------------------------(Name of the post) for ------ -------------------------------------------------------------------------- Water Quality Monitoring & Surveillance Program me (WQM&SP)

१. Set out below are the terms and conditions under which **Mr./Ms.** ----------------------------------- ------------------------------------ is given this Contractual assignment. His / her services on contract basis are presently required for--------------------------------------------------------------.

२. This Contractual assignment is given for a period of -------------months from the **date** --------- -----------------

३. Any decision taken on the basis of inputs pertaining to specific expertise possessed by the assignee appointed on contract, if results into a financial loss to the government, which if proved to have been caused due to lack of application of mind or dereliction of duty by him /her, the ----------------shall have right to fix the responsibility upon him/ her and recover the loss from him/ her.

४. This Contractual period of -------------months of the assignment may be shortened or terminated any time during this period depending upon the need and progress of the work. In the event of the termination of this assignment before the agreed period, he/ she will be paid for the service rendered by him / her for carrying out the assignment till the date of termination of the contract and he/ she will hand over his / her charge to the person authorized by---------- ------------- along with all the information and documentation possessed or gathered by him/ her while rendering the service under this contract.

५. His/ her services will be exclusively utilized for--------------------- under overall superintendence, control and guidance of ---------------, --------------- will have control over his / her daily work. He /She will perform his / her duties as per job chart / roles and responsibilities appended with this and shall be subject to performance appraisal. However , --- ---------------- may assign him/ her any other function, responsibility or task as regards the overall implementation of Water Supply and Sanitation Program in any part of the State.

६. ----------------will pay him/ her directly a fix consolidate remuneration of Rs.-------------------- -(Rupees----------------------------) per month during the contact period at the end of every month or part thereof on his / her satisfactory performance of the assignment for that month. The above rate is subject to deduction of any taxes, which are required to be lawfully deducted from his / her remuneration. The above remuneration may, positively, be changed by the Water Supply and Sanitation Dept, if found necessary and it may be given at any point of time during this contract period.

७. No other remuneration, compensation or benefits are admissible to him / her for this contractual assignment.

८. If he / she desires to leave the assignment for any reason before the termination of contractual period, he / she will give **one months** notice or deposit equivalent remuneration in lieu of notice.

९. All materials produced or acquired under the terms of this agreement written, Digital / Computerised, Software, Graphic, film, and magnetic tape or otherwise, shall remain the property of Water & Sanitation Support Organization. Water Supply and Sanitation Department retains the exclusive right to publish or disseminate reports arising from such materials. His / her responsibility and duties in this paragraph shall continue, notwithstanding the termination of the termination of this contract for the execution of its other provisions.

१०. He / she also agrees that all knowledge and information not within the public domain which may be acquired during the carrying out of this contract, shall be for all the times and for all purposes, regarded as strictly confidential and held in confidence and shall not be directly or indirectly disclosed to any person whatsoever, except with the prior approval of Water Supply and Sanitation Department, Government of Maharashtra.

**११. Clear Understanding is given that, this is purely a contractual engagement and it is not a permanent job with Government of Maharashtra**.

**१२. Mr./Ms.** ------------------------------ hereby gives an undertaking that he / she will continue to serve the ------------------- for the said **period.** His / her consolidated pay for a period of one month will be retained by the ------------ and shall be paid to him/ her after the completion of the said period. It will be forfeited if he / she leaves the project before the completion of the said period.

**१३. Mr./Ms.** ------------------------------ will be given an Identity Card duly signed by ------------------- after his / her contractual assignment and he / she hereby agrees that the said Identity Card shall be returned to the -----------,--------- after his / her contractual period comes to an end or upon termination of his / her services whichever happens earlier, failing which legal action shall be initiated against him / her.

**१४. Mr./Ms.** ------------------------------ hereby agrees and gives undertaking that , he / she shall not put along claim whatsoever to regularize her / him in a permanent service.

**१५. Mr./Ms.** ------------------------------ hereby agrees to carry out his / her assignment for ---------------- on above terms and conditions and assures to give his / her services, accordingly for the acceptance of which, he / she has put his / her signature below:

I agree and accept the assignment on above terms and conditions.

| | | |
|---|---|---|
| **Date-** | **Name ( Candidate)-** | **Name ( Sr. Geologist)** |
| **Place-** | **Sign.( Candidate)-** | **Sign. ( Sr. Geologist)** |

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत
जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळे करीता कंत्राटी तत्वावर पदभरती
वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग
जिल्हाधिकारी प्रशासकीय इमारत, बी विंग, दालन क्र. ३११ सिंधुदुर्ग ४१६८१२.

दूरध्वनी - (०२३६२) - २२८७१३ /२२८०६५ ईमेल- srgeologistoros@gmail.com

जाहिरात क्रमांक ०१/२०१७ दिनांक- ११/०८/२०१७

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व क्षेत्र बळकटीकरणासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांचे अधिनिस्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या जिल्हास्तरावरील - १ उपविभागीय स्तरावरील - ३ प्रयोगशाळेत आणि १ जिल्हास्तरावरील संनियंत्रण कक्षाकरीता खालील पदे कंत्राटी तत्वावर भरती करावयाची आहेत.

| अ.क्र | पदाचे नांव | भरावयाची एकूण पदे | पदांचे वर्गीकरण |
|---|---|---|---|
| १ | रसायनी | ३ | अ.जा.- १<br>अ.ज.- १<br>खुला - १ |
| २ | अणुजैविक तज्ञ | २ | अ.जा - १<br>अ.ज.- १ |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक | ४ | **अ.जा.-१<br>अ.ज.- १<br>खुला - २<br>(महिला-१)** |
| ४ | प्रयोगशाळा मदतनीस/ मदतनीस | ३ | अ.ज.- १<br>खुला- २<br>**(महिला-१)** |
| **एकुण पदे** | | १२ | **आरक्षित - ७<br>खुला - ५ (महिला-२)** |

**टिप- प्रयोगशाळा कंत्राटी पदभरती संबंधित मानधन, शैक्षणिक अर्हता, परिक्षा शुल्क, अर्जाचा नमुना, पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या व इतर भरती संबंधित माहितीचा तपशिल हा www.sindhudurg.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द्करण्यात आला आहे.**

स्वाक्षरीत-
वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सिंधुदुर्ग (ओरोस)

स्वाक्षरीत-
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
अध्यक्ष निवड समिती जिल्हा परिषद
सिंधुदुर्ग